श्री.सुभाष नवसु पवार, तत्कालीन ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत-धामोरी ता.कोपरगाव यांचे गैरवर्तनाबाबत विभागीय चौकशी सुरु करणेकामी चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांची नेमणूक करणेबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर

ग्रामपंचायत विभाग

आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/४६९/२०२६

दिनांक - स्वाक्षरी खाली नमूद केलेप्रमाणे

संदर्भ - १.या कार्यालयाचे ज्ञापन क्र.ग्रापं-३/५५११०६/२०२४,दिनांक २७/०८/२०२४

२.गटविकास अधिकारी श्रीरामपूर यांचे पत्र आस्था-२/६५८/२६,दिनांक ०४/०८/२०२६ चे पत्र (श्री.पवार यांचे ज्ञापन पोहोच दिनांक ०४/०८/२०२६)

३. गटविकास अधिकारी श्रीरामपूर यांचे पत्र आस्था-२/९४५/२६,दिनांक १३/१०/२०२६

४. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) १९६४ मधील नियम (६)(३)

५.सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्र.विचौ-१/प्र.क्र.४५/१३२५-वशिअ,मुंबई दिनांक २५ एप्रिल २०२५

ज्याअर्थी, श्री.सुभाष नवसु पवार, तत्कालीन ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत-धामोरी ता.कोपरगाव येथे कार्यरत असताना गैरवर्तन केल्याने त्यांचे विरुध्द संदर्भ क्र.१ अन्वये एकुण ०२ दोषारोप ठेवुन ज्ञापन/दोषारोपपत्र बजावण्यात आले होते. संदर्भ क्र.२ नुसार श्री.सुभाष नवसु पवार, तत्कालीन ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत-धामोरी ता.कोपरगाव यांना ज्ञापन/दोषारोप पत्र बजावलेबाबत पोहोच कार्यालयास प्राप्त झाली आहे. संदर्भ क्र.३ नुसार श्री.सुभाष नवसु पवार, तत्कालीन ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत-धामोरी ता.कोपरगाव यांनी अद्यापपर्यंत ज्ञापन दोषारोपांचा खुलासा सादर केला नाही.

सबब, श्री.सुभाष नवसु पवार, तत्कालीन ग्रामविकास अधिकारी यांचे विरुध्द न्याय हक्काचे दृष्टीने चौकशी करणे आवश्यक असलेने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ६ च्या तरतुदींनुसार चौकशी करण्याचे निश्चित करण्यात आलेले आहे. त्यासाठी सदरची चौकशी करणेकामी चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

त्याअर्थी मी, मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद अहिल्यानगर, उक्त नियमाच्या तरतुदींनुसार व मला प्रदान करणेत आलेल्या शक्तींचा वापर करुन श्री.सुभाष नवसु पवार, तत्कालीन ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत-धामोरी ता.कोपरगाव यांचेवर ठेवण्यात आलेल्या दोषारोपाच्या संदर्भात चौकशी करण्याचे आदेश देत आहे. सदरची चौकशी करणेकामी चौकशी अधिकारी म्हणून सहाय्यक आयुक्त (चौकशी), नाशिक विभाग, नाशिक यांची व सादरकर्ता अधिकारी म्हणून जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचे वतीने श्री तोरवणे प्रशांत नानाजी, विस्तार अधिकारी (पं) पंचायत समिती कोपरगाव यांची नियुक्ती करीत आहे .

नियुक्त सादरकर्ता अधिकारी यांनी प्रत्येक चौकशीचे तारखेस हजर रहावे. त्याचप्रमाणे श्री.सुभाष नवसु पवार, तत्कालीन ग्रामविकास अधिकारी यांच्या विरुध्द ठेवण्यात आलेल्या दोषारोपांचे आक्षेप व पुरावे यांचा सखोल अभ्यास करुन जिल्हा परिषदेची सक्षम प्रकारे बाजू मांडावी. विभागीय चौकशी वेळेत पुर्ण करणे कामी आवश्यक ते सर्व कामकाज नियमाप्रमाणे करावे व होणा-या प्रत्येक सुनावणीस नियुक्त सादरकर्ता अधिकारी यांनी उपस्थित रहावे.

नियुक्त सादरकर्ता अधिकारी यांनी प्रत्येक चौकशीच्या तारखेस हजर रहावे. त्याचप्रमाणे श्री.सुभाष नवसु पवार, तत्कालीन ग्रामविकास अधिकारी यांच्या विरुध्द ठेवण्यात आलेल्या दोषारोपांचे आक्षेप व पुरावे यांचा सखोल

अभ्यास करुन जिल्हा परिषदेची सक्षम प्रकारे बाजू मांडावी. विभागीय चौकशी वेळेत पुर्ण करणे कामी आवश्यक ते सर्व कामकाज नियमाप्रमाणे करावे.

विभागीय चौकशी प्रकरणीचे कामकाजात टाळाटाळ करण्याचे गैरवर्तन केल्याचे निदर्शनास आल्यास सादरकर्ता अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल, याची नोंद घ्यावी. या खाते निहाय विभागीय चौकशीस महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ च्या नियमातील तरतुदी लागू राहतील.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक 202611171006022R असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 17-11-2026 13:04:54
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

१. सहाय्यक आयुक्त, (चौकशी),
विभागीय आयुक्त कार्यालय,
नाशिक विभाग, नाशिक.

२/- सोबत श्री.सुभाष नवसु पवार, तत्कालीन ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत-धामोरी ता. कोपरगाव यांची गैरवर्तनाबाबतचे पत्रव्यवहार संचिका या समवेत जोडली आहे. तरी चौकशी करुन अहवाल इकडेस सादर करावा.

२. श्री तोरवणे प्रशांत नानाजी, विस्तार अधिकारी (पं) पंचायत समिती कोपरगाव.
व्दारा व प्रत: -गटविकास अधिकारी, पंचायत समिती कोपरगाव.

२/- सादरकर्ता अधिकारी म्हणुन आपली नियुक्ती करण्यात आलेली असुन संदर्भ क्र.५ च्या परिपत्रकाचे सुक्ष्म अवलोकन करुन पुढील नियमोचित कार्यवाही करावी.

३. गटविकास अधिकारी, पंचायत समिती श्रीरामपुर.

२/- सोबतचा आदेश श्री.सुभाष नवसु पवार, तत्कालीन ग्रामविकास अधिकारी यांना बजावून तो मिळालेबाबत दुय्यम प्रतीवर त्यांची तारखेसह स्वाक्षरी घेऊन पोहोच या कार्यालयास सादर करावी.

४. निवड नस्ती.